क्रमांक :- प्राशिसं/शापोआ/अंमल/२०१३/३०३

दिनांक : ३१/०७/२०१३

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हा परिषद, सर्व

विषय : शालेय पोषण आहार योजना
गुणवत्ता, सुरक्षितता व स्वच्छता संदर्भात दक्षता घेणेबाबत.

संदर्भ : केंद्र शासनाचे पत्र क्र. १-४/२०१३ - Desk (MDM),
दिनांक २२/०७/२०१३.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पोषण आहारातून लाभार्थी विद्यार्थ्यांना विषबाधा किंवा इतर अनुचित प्रकार घडू नयेत या करिता खालील बाबींची दक्षता घेण्याच्या सूचना शाळा स्तरावर देण्यात याव्यात.

१) विद्यार्थ्यांना खिचडी देण्यापूर्वी, शिक्षकाने किंवा शाळा व्यवस्थापन समिती सदस्याने प्रथम अन्न खाऊन तपासणी करावी व नंतरच विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप करावे. तसेच चव नोंद वहीमध्ये याबाबतची रोज नोंदी घेण्यात याव्यात.

२) शालेय पोषण आहार योजनेचे धान्य शाळेतील स्वयंपाक गृहात / खोलीत स्वच्छ ठिकाणी सुस्थितीत ठेवण्यात यावे. धान्य ठेवण्याकरिता कोठयांचा वापर करावा. व धान्य ओलाव्या पासून दूर ठेवावे जेणे करुन ते खराब होणार नाही. योजनेचे धान्य इतरत्र न ठेवता शाळा परिसरातच ठेवण्यात यावे.

३) स्वयंपाकी मदतनीस यांना स्वच्छता व सुरक्षिततेबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे या कामी आवश्यकतेनुसार आपल्या जिल्हयातील कोश डलळशपलश (गृह विज्ञान) महाविद्यालयांची मदत घेण्यात यावी. त्याचप्रमाणे पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी शाळांना वेळोवेळी भेटी देऊन योजनेची अंमलबजावणीची तपासणी करावी व तपासणी अहवाल जिल्हा स्तरीय सनियंत्रण व मुल्यमापन समितीकडे सादर करुन त्यानुसार योग्य कार्यवाही करावी.

४) स्वयंपाकी व मदतनीस यांनी स्वच्छतेविषयी काळजी घेणे आवश्यक आहे त्यानुसार त्यांना नियमित नखे कापणे, स्वयंपाक सुरु करण्यापूर्वी व आहार वाटप करण्यापूर्वी हात व पाय साबणाने स्वच्छ धुवून घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

५) आहार शिजविण्याकरिता वापरण्यात येणारी भांडी स्वच्छ असल्याची खात्री करण्यात यावी.